# <u>पदभरतीसंदर्भात उमेदवारांना सूचना</u>

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या स्तरावरुन संचालनालयांतर्गत सर्व सहा प्रादेशिक कार्यालय, खुद्द संचालनालय व महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई येथील रिक्त पदे भरण्यासंदर्भात वर्ग-३ संवर्गातील वेगवेगळी पदनामांची पदे भरण्याकरीता ऑगस्ट २०१४ व सप्टेंबर २०१४ मध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्या अनुषंगाने इच्छूक उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर केले असून अशा उमेदवारांची लेखी परीक्षा दि.२२.११.२०१५ रोजी घेण्यात आली होती. तसेच वाहनचालक व इतर काही पदांकरीता व्यावसायिक चाचणी परीक्षा घेण्यात आली. या चाचणीच्या अनुषंगाने प्रोव्हिजनल उत्तरतालिका व हरकती मागवून अंतिम सुधारित उत्तरतालिका दि.२४.५.२०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. परंतु मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.६.५.२०१६ च्या आदेशानुसार सदर जाहिरात रद्द करण्यात आली होती. सदरच्या आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन दाखल करण्यात आले आहे. मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.२३.११.२०१६ रोजी खालील प्रमाणे अंतरिम आदेश दिलेले आहेत.

**"It would be open for the petitioners to continue selection process for other posts covered under advertisement dated ३०.८.२०१४, excluding the posts of craft instructors."**

या अंतरिम आदेशाचा विचार करुन पदभरतीबाबत संचालनालय स्तरावरुन प्रसिध्द झालेल्या जाहिरातीतील शिल्पनिदेशक पदे वगळून गणित निदेशक, चित्रकला निदेशक, भांडार अधिक्षक, सहाय्यक भांडारपाल/भांडार लिपिक, लघुलेखक(निम्नश्रेणी), लघुटंकलेखक(म.), वाहनचालक, वरिष्ठ लिपिक व कनिष्ठ लिपिक या पदांचा निकाल जाहिर करण्यात येत आहे. या निकालानुसार व याबाबत असणा-या शासन निर्णयानुसार सामाजिक व समांतर आरक्षणाचा विचार करुन संबंधित पात्र उमेदवारांची ऑनलाईन अर्जामध्ये भरलेल्या माहितीनुसार आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रे यांची पडताळणी दि.२.१.२०१७ रोजी संबंधित प्रादेशिक कार्यालय स्तरावर करण्यात येईल. या पडताळणीअंती पात्र उमेदवारांची निवड व प्रतिक्षा यादी जाहिर करण्यात येईल याची संबंधित उमेदवारांना नोंद घ्यावी.

स्थळ :- मुंबई.
दिनांक :-१७.१२.२०१६

अध्यक्ष,
गट-क व गट-ड पदभरती संनियंत्रण समिती,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, व
कौशल्य विकास व उद्योजकता संचालनालय,मुंबई.